**प्रेस नोट दिनांक ०२/०७/२०१९**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

**<u>"सापडलेली बॅग परत मुळ मालकाच्या ताब्यात देणारा प्रामाणिक पोलीस नवनाथ भोसले"</u>**

अहो साहेब तुमची बॅग आम्हाला सापडली आहे. त्यामध्ये पैसे आणि मोबाईल आहे. तुम्ही दत्तवाडी पोलीस स्टेशन ला या. ! असा फोन अत्यंत घाबरुन गेलेल्या वय वर्ष ६० असलेल्या व्यक्तीस आला आणि तो व्यक्ती पोलिसचा फोन आल्यावर घाबरण्याऐवजी अत्यंत आनंदी झाला. अहो त्याला कारण सुध्दा तसेच होते. दिनांक १ जुलै २०१९ रोजी पुण्यासह संपुर्ण महाराष्ट्र भर अत्यंत जोरदार पावसाने हजेरी लावल्याने दिवस भर पाऊस चालु होता. लक्ष्मीनगर पर्वती परिसरात राहणारे राजाराम दत्तात्रय संत वय ६० वर्ष असलेले ज्येष्ठ नागरिक आपल्या पत्नीला अचानक पोटाचा त्रास होऊ लागल्याने त्यांना दवाखान्यात उपचारासाठी न्यायचे होते. परंतु खडकी ॲम्युनेशन फॅक्ट्री मधुन निवृत्त झाल्यामुळे केंद्र शासनाच्या मिळणा-या तुटपुंज्या निवृत्ती वेतनावर संपुर्ण महिनाभर घर भागवताना तारेवरची कसरत करण्यात नाकी नऊ येत असताना हा अचानक दवाखान्याचा खर्च कसा काय उभा करायचा हया विवंचनेत असताना त्यांनी नातेवाईकांकडुन उसनवारी करुन कसे बसे १०,०००/-रुपये जमा केले. त्यांनी आपल्या पत्नीस होणारा त्रास असाहय होऊ लागल्याने त्यांना रिक्षात बसवुन दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथे पुढे पाठविले व स्वतः जमा केलेले १०,०००/-रुपये व दवाखान्यात लागणारे साहित्य व मोबाईल एका बागेत टाकुन भर पावसात लक्ष्मीनगर मार्गे दुचाकी वरुन हॉस्पिटल मध्ये गेले. पत्नीला ॲडमिट करायच्या वेळेस हॉस्पिटल च्या काऊंटर वर जेव्हा पैसे भरण्याची वेळ आली त्यावेळेस बॅग गहाळ झाली असल्याचे त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांच्या पाया खालील वाळु घसरली, त्यांनी तश्या परिस्थितीमध्ये ज्या भागातुन आपण आलो तिथे शोध घेऊ असा निश्चय केला व ते शोध मोहिमेस बाहेर पडणार तितक्यात त्यांना मोबाईलवर फोन आला व पलीकडुन बोलणा-या व्यक्तीने त्यांना सांगितले की, मी नवनाथ भोसले पोलीस नाईक दत्तवाडी पोलीस स्टेशन येथुन बोलत असुन आपली बॅग मला सापडली आहे. त्यामध्ये १०,०००/- रुपये, मोबाईल, पासबुक, बॅक एटीएम कार्ड, तुमचे आयकार्ड आहेत ते तुम्ही घायला या !

असे ऐकताच त्यांना अत्यंत आनंद झाला व त्यांनी आपल्या मुलीसह येऊन त्यांची बॅग ताब्यात घेतली व पोलिस नाईक नवनाथ भोसले यांचे मनःपुर्वक धन्यवाद मानले. त्यावेळेस नवनाथ भोसले यांनी सांगितले की, पाऊस पडत असल्याने वाहतुक सुरळित करत असताना आम्हाला एक बॅग मिळुन आली. त्या बॅगची पाहणी केली असता त्यामध्ये रोख रक्कम व मोबाईल मिळुन आल्यावर त्यांच्यांशी संपर्क करुन लगेच त्यांना त्यांची बॅग सुपुर्त केली आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.